• प्रशासन • नगर जिल्ह्यातील दोन मतदारसंघांमध्ये सुमारे सव्वातीन हजार मतदान केंद्र

# शाईसह मतदानाचे साहित्य आठवडाभरात येणार

प्रतिनिधी | नगर

लोकसभा निवडणुकीकरिता मतदारांच्या डाव्या हाताच्या बोटाला शाई लावण्यासाठी महाराष्ट्रात ३ लाख शाईच्या बाटल्या लागणार आहेत. त्यांचे वाटप निवडणूक आयोगाने जिल्हाधिकाऱ्यांना केले आहे. नगर जिल्ह्यातील दोन मतदार संघासाठीही या शाईच्या बाटल्या व मतदानाचे साहित्य आठवड्यात प्राप्त होईल. काही दिवस न पुसली जाणारी ही शाई म्हैसूर पेंटस् कंपनीमार्फत बनवली जाते.

मतदानाचा हक्क बजावल्याची खूण म्हणून सर्वसामान्य असो की लोकप्रतिनिधी अथवा खास व्यक्तींकडून शाई लावलेल्या डाव्या हाताचे बोट अभिमानाने दाखवले जाते. लोकशाही मजबूत करणारी ही काळी रेष निवडणुकांचा अविभाज्य घटक बनली आहे. यंदाच्या लोकसभा निवडणुकांकरिता महाराष्ट्रातील ४८ मतदार संघांमध्ये पावणे ९ कोटी मतदार मतदानाचा हक्क



बजावतील.

मतदारांच्या डाव्या तर्जनीवर शाई लावण्याकरिता निवडणूक आयोगामार्फत सुमारे ३ लाख शाईच्या बाटल्याची मागणी करण्यात आली होती. या सर्व बाटल्या प्राप्त झाल्या आहेत. जिल्हाधिकाऱ्यांच्या ताब्यात देण्यात आल्या आहेत. नगर जिल्ह्यातील दोन मतदारसंघांमध्ये सुमारे सव्वा तीन हजार मतदान केंद्र आहेत. त्यावर शाईच्या बाटल्या व मतदानासाठी आवश्यक ते साहित्य पुढील आठवड्यात पोहोच होईल.

मतदान केंद्रावर मतदाराची ओळख पटवल्यानंतर त्याला प्रवेश दिला जातो. प्रत्यक्ष मतदानापूर्वीच मतदाराच्या डाव्या बोटावर न पुसली जाणारी शाई लावली जाते. त्यानंतर मतदाराची स्वाक्षरी किंवा अंगठा घेतला जातो. मतदानापूर्वी पोलिंग ऑफिसर मतदाराच्या डाव्या बोटावर शाई लावलीय का नाही, ते तपासतात. शाई लावलेली असेल, तर त्याने यापूर्वी मतदान केल्याचे स्पष्ट होते.

तसेच जी व्यक्ती डाव्या बोटाची तपासणी करु देत नाही, ते मतदानासाठी अपात्र असल्याचे मतदान अधिकारी त्यावेळी सांगू शकतात, जर एखाद्या मतदाराला डाव्या हाताचे बोट नसेल, तर त्या व्यक्तीच्या डाव्या हातावरील कोणत्याही बोटाला शाई लावली जाते. मतदान केल्याचा पुरावा म्हणून ही खूण ग्राह्य धरली जायची. या वेळी मतदाराला मतदान केल्याची स्लीपही मिळणार आहे.

# सी-व्हिजीलवर तक्रार केल्यास कारवाई

महेश पाटील

राहुरी : प्रतिनिधी

राहुरी विधानसभा मतदार संघामध्ये लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेची अंमलबजावणी होण्यासाठी 'सी-व्हिजील' या ॲपची निर्मिती करण्यात आली असून तक्रार आल्यास १०० मिनिटांच्या आत कारवाई केली जाणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी महेश पाटील व तहसीलदार फसियोद्दीन शेख यांनी दिली आहे.

राहुरी विधानसभा मतदारसंघात लोकसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक निर्णयाधिकारी महेश पाटील यांच्या मार्गदर्शनात व राहुरी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी खामकर यांच्या मार्गदर्शनात आदर्श आचारसंहितेचे पालन होण्यासाठी विशेष उपाययोजना करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. नायब तहसीलदार गणेश तळेकर हे निवडणूक विभागात सचिव म्हणून कार्यरत आहेत.

आचारसंहितेचा भंग होत असल्यास सी-व्हिजील ॲपद्वारे तक्रार करण्याची सुविधा देण्यात आली आहे. तक्रार निवारणार्थ ३ फ्लाईंग स्कॉडची स्थापना करण्यात आली असून त्यांच्यासमवेत पोलिस पथकही कारवाईत सहभागी राहणार आहे. फलाईंग स्कॉडच्या अधिकाऱ्यांना दंडाधिकाऱ्यांचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

अवैध दारू वाहतुकीसह इतर प्रकारच्या संशयास्पद वाहतुकीवर नजर ठेवण्यासाठी चौफुला व नाक्यांवर स्टॅस्टीकल सर्व्हे टिम नेमण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीसाठी आचारसंहितेची कडक अंमलबजावणी केली जाणार असून सोशल मीडियावरही नजर असणार आहे. त्यामुळे नागरीकांनी आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# दिव्यांग मतदारांना आवश्यक त्या सोयीसुविधा पुरवा : माने

प्रतिनिधी | नगर

दिव्यांग व्यक्तींना मतदान प्रक्रिया सहजसुलभ व्हावी, त्यांचा मतदान प्रक्रियेत सहभाग वाढावा. यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार त्यांना आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून द्या, असे निर्देश विभागीय आयुक्त राजाराम माने यांनी सोमवारी दिले.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने केलेल्या तयारीचा आढावा व दिव्यांग मतदारांना मतदानासाठी पुरवण्यात येणाऱ्या सुविधांबाबत शिर्डी विश्रामगृह येथे आयोजित बैठकीत ते बोलत होते. या वेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल व्दिवेदी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वजित माने, अपर जिल्हाधिकारी तथा शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी पिराजी सोरमारे यांच्यासह विधानसभा मतदारसंघाचे सहाय्यक निवडणूक अधिकारी व तहसीलदार उपस्थित होते. विभागीय आयुक्त माने म्हणाले, मतदान प्रक्रियेत जास्तीत जास्त दिव्यांग मतदारांचा सहभाग वाढला पाहिजे. यासाठी मतदारसंघनिहाय दिव्यांग मतदारांची माहिती उपलब्ध करून ठेवावी, त्यानुसार त्यांना मतदान केंद्रावर आणण्यासाठी वाहन व्यवस्था, त्यांना सहाय्यकाची आवश्यकता भासणार असल्यास तशी माहिती संकलित करणे, त्यांना मतदान केंद्रावर रॅम्प, पिण्याचे पाणी, मदत कक्ष आदी व्यवस्थेसह दिव्यांग मतदारांना मतदानाच्या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच त्यांना मतदान करणे सुलभ होईल याकडे लक्ष द्यावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.



लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने केलेल्या तयारीचा आढावा व दिव्यांग मतदारांना मतदानासाठी पुरवण्यात येणाऱ्या सुविधांबाबत शिर्डी विश्रामगृह येथे आयोजित बैठकीत बोलताना विभागीय आयुक्त राजाराम माने.

माने यांनी जिल्ह्यातील एकूण मतदार, मतदान केंद्र, सहाय्यकारी मतदान केंद्र, उपलब्ध मनुष्यबळ, ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशीन, स्ट्राँगरुम, वाहतूक आराखडा आदींची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्याकडून जाणून घेतली. तसेच मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर मतदारांची गैरसोय होऊ नये यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या सूचनाही माने यांनी दिल्या आहेत.

पुढारी

# ओळखपत्राला आधार, पॅनकार्ड पर्याय

## लोकसभा निवडणूक मतदानासाठी इतर ११ दस्तऐवज ग्राह्य धरणार

**नगर : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीसाठी मतदान करण्यासाठी ओळख पटविण्यासाठी मतदान ओळखपत्र (ईपीक कार्ड) सादर करु शकत नाहीत, अशा मतदारांना त्यांची ओळख पटविण्यासाठी इतर ११ पर्यायी दस्तावेज ग्राहय धरण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल द्विवेदी यांनी सांगितले.

छायाचित्रांसह मतदार ओळखपत्रांसंदर्भातही आयोगाने सूचना दिल्या आहेत. जर छायाचित्रासह मतदार ओळखपत्राद्वारे मतदाराची ओळख पटत असेल तर त्यातील टंकलेखन व शब्दलेखन चुका आदी किरकोळ विसंगती दुर्लक्षित करण्यात याव्यात. जर एखाद्या मतदाराचे नाव ज्या ठिकाणी मतदान करीत आहे त्या मतदान केंद्राच्या संबंधित मतदार यादीत असेल आणि तो अन्य विधानसभा मतदारसंघाच्या मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी जारी केलेले मतदार छायाचित्र ओळखपत्र सादर करीत असेल तर असे मतदार ओळखपत्र देखील मतदाराच्या ओळख पटविण्यासाठी स्वीकारण्यात यावे. छायाचित्रासह मतदार ओळखपत्रावरील विसंगत छायाचित्र आदी मुळे मतदाराची ओळख पटविणे शक्य नसल्यास मतदारास आयोगाने ठरवून दिलेल्या इतर ११पर्यायी कागदपत्रांपैकी एक ओळख दस्तावेज सादर करणे आवश्यक आहे.

त्यानुसार मतदार यादीत नाव आहे. परंतु मतदान ओळखपत्र उपलब्ध नसल्यास अशा मतदारांना पासपोर्ट, वाहन चालक परवाना, केंद्र व राज्य सरकार, सार्वजनिक उपक्रम, पब्लिक लिमिटेड कंपन्या यांनी कर्मचाऱ्यांना जारी केलेले फोटोसह सेवा ओळखपत्र, बँक व पोस्ट ऑफीसद्वारे जारी केलेल्या फोटोसह पासबुक, पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी (एनपीआर) अंतर्गत भारताचे महानिबंधक (आरजीआय)द्वारा जारी केलेले स्मार्ट कार्ड, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा) जॉब कार्ड, श्रम मंत्रालयाच्या योजनेंतर्गत जारी केलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, फोटोसह पेन्शन दस्तावेज, खासदारांना व आमदारांना जारी करण्यात आलेले अधिकृत ओळखपत्र आणि आधारकार्ड आदी ११ पैकी एक ओळखपत्र सादर केल्यास मतदान करता येणार असल्याचे जिल्हाधिकारी द्विवेदी यांनी सांगितले.

जे परदेशी मतदार त्यांच्या पासपोर्टमधील तपशीलांवर आधारित लोक प्रतिनिधीत्व अधिनियम १९५० च्या कलम २० ए अंतर्गत मतदार यादीत नोंदणीकृत आहेत, त्यांना मतदान केंद्रात केवळ त्यांच्या मूळ पारपत्राच्या आधारेच ओळखले जाईल, असेही आयोगाने स्पष्ट केले आहे.

पुढारी

# निवडणूक कामासाठी मनपाचे १९७ कर्मचारी

**नगर : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या कामकाजासाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळाची आवश्यकता असल्यामुळे सर्व शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या वर्ग चारच्या तब्बल १९७ कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली.

काही दिवसांपूर्वी निवडणूक विभागाच्या वतीने महापालिकेच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी निवडणूक कामकाजाचे प्रशिक्षण आयोजित केले होते. महापालिकेच्या दैनंदीन सुविधा व अत्यावश्यक सेवा असलेल्या विभागाचे कर्मचारी वगळता इतर कर्मचाऱ्यांची माहिती मनपाने निवडणूक विभागाकडे पाठविली होती. त्यानुसार निवडणूक विभागाने १९७ कर्मचाऱ्यांची निवडणुकीच्या कामकाजासाठी नियुक्ती केली आहे. या कर्मचाऱ्यांना ७ एप्रिलला प्रशिक्षण दिले असून २२ व २३ एप्रिल रोजी मतदान प्रक्रियेसाठी त्यांच्या नियुक्त्या केल्या जाणार आहे.

My Ahmednagar Edition
26 Mar, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

लोकमत

# नेवासा येथे लोकसभा निवडणूक प्रशिक्षण वर्ग

लोकमत न्यूज नेटवर्क

नेवासा : लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मतदान केंद्रस्तरीय पथकांचे प्रशिक्षण नेवासा येथे शनिवारी पार पडले.

यावेळी निवडणूक प्रक्रियेची आणि मतदान यंत्रांची सखोल माहिती देण्यात आली. प्रथम सत्रामध्ये मतदान केंद्रांवरील निवडणुकीची प्रक्रिया समजावून सांगण्यात आली. यावेळी लोकसभा निवडणुकीत पहिल्यांदाच व्हीव्हीपॅट यंत्राचा वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेत झालेले बदल आणि व्हीव्हीपॅटची हाताळणी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. संगणकीय सादरीकरण व प्रशिक्षण व्हिडीओच्या माध्यमातून हे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी उप जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी शाहूराज मोरे यांनी मार्गदर्शन केले. नायब तहसीलदार दत्तात्रय भावले, दादासाहेब शेळके, निवासी नायब तहसीलदार ज्योतिप्रकाश जायकर, गटशिक्षणाधिकारी विलास साठे, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी समीर शेख आदी उपस्थित होते.

लोकमत

# व्हीव्हीपॅट मशिनबाबत कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क



**कर्जत :** लोकसभा निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेत वापरण्यात येणाऱ्या व्हीव्हीपॅट मशिनविषयी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

कर्जत-जामखेड विधानसभा मतदारसंघातील सर्व सरकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांसह शिक्षक व प्राध्यापकांचे निवडणूक प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षण वर्गात सहायक निवडणूक अधिकारी तथा कर्जतच्या प्रांताधिकारी अर्चना नष्टे यांनी मतदान प्रक्रियेतील सर्व टप्प्यांबाबत मार्गदर्शन केले.

मतदान प्रक्रियेतील सविस्तर माहिती तसेच मतदान प्रक्रियेमध्ये वापरण्यात येणाऱ्या नवीन व्हीव्हीपॅट मशिनबाबत प्रबोधन करण्यात आले. प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी करावयाची कामे व मतदान प्रक्रियेमध्ये येणाऱ्या अडीअडचणीबाबत माहिती देऊन उपस्थितांच्या शंकांचे प्रांताधिकारी नष्टे यांनी निरसन केले.

जामखेडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे, कर्जतचे नूतन तहसीलदार सी.एम. वाघ उपस्थित होते.